## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.११/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८०/२०११/जा.९१०, दि. ११/११/२०११, १६/११/२०११ व २३/११/२०११.
३) मे. अदानी विलमर लि. यांचे दि.१६/११/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.
४) मे. अदानी विलमर लि. यांचे दि.२५/११/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.
५) मे. अदानी विलमर लि. यांचे दि.०१/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.
६) मे. अदानी विलमर लि. यांचे दि.०२/१२/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८०/२०११/जा. १०३९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २७/१२/२०११.

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ९/११/२०११ रोजी या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचांसमवेत मे. अदानी विलमर लि. यांचे गोडाऊन क्र. अे १४, गाळा क्र १५ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स, वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथील कंपनीच्या गोदामात दुपारी ३.३० वाजता तपासणी करण्यासाठी नमुद पत्यावर भेंट दिली असता गोदामांत विविध ब्रांड असलेल्या तेलाचे बॉक्सेस व टिन पत्राचे विविध क्षमतेचे खादयतेलाने भरलेले डबे आढळून आले.

पथकाने पंचांसमवेत सदर गोदामात प्रवेश करुन उपस्थित व्यक्तीस त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव हेमंत भरत कोटक असे सांगुन सदर गोदामामध्ये मे. अदानी विलमर लि. या कंपनीच्या वतीने कॅरींग ॲन्ड फॉर्वर्डीगचे काम गेले अडीच वर्षा पासुन करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर हेमंत भरत कोटक यांना अधिकाऱ्यांनी स्वत:ची ओळख करुन देवून गोदामात साठवणूक केलेल्या मोठया प्रमाणावर खादयतेल साठयाच्या

संदर्भात अधिकृत परवाना व इतर कायदेशीर दस्ताऐवजाची पहाणी करीता मागणी केली असता, हेमंत भरत कोटक यांनी खादयतेलाचा साठा व विक्री करीता परवाना मिळणेकरीता दिनांक १०/१०/२००९ व दिनांक १२/०१/२०१० रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे येथे लेखी अर्ज सादर केल्याबाबतच्या पत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या. तसेच गोदामाच्या जागेबाबत अधिकृत कागदपत्रांची विचारणा केली असता उपस्थित इसमाने जागेच्या करारपत्राच्या छायांकित प्रती सादर केल्या.

तदुनंतर अधिकाऱ्यांनी हेमंत भरत कोटक यांना खादयतेलाच्या साठवणूक व विक्री करीता परवाना प्राप्त करुन न घेतल्याबाबत ते करीत असलेला व्यवसाय अनधिकृत असल्याबाबत त्यांना सांगुन गोदामात असलेल्या खादयतेलाच्या साठयाची हेमंत भरत कोटक व पंचांसमक्ष प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आली असता सदर गोदामामध्ये खादयतेल/वनस्पती यांचा ५,९२,७८१ कि.ग्रॅ. (५९२७.८१ क्विंटल) व पामतेलचा २०,७४९ कि.ग्रॅ. (२०७.४९ क्विंटल) साठा आढळून आला.

उपरोक्त नमुद विनापरवाना साठवणूक केलेल्या खादयतेलाचा साठा, दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम २(Z)(IV)(VI), ३, ४, १० चा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्यामुळे उपस्थित अधिकाऱ्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५(सी) अन्वये सदरचा संपुर्ण खादयतेलाचा विनापरवाना/अनधिकृत असलेला साठा पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन जप्त करण्यात आला. सदर जप्त केलेल्या खादयतेलाच्या साठयाचा सुपूर्दनामा करुन हेमंत भरत कोटक यांच्या ताब्यात देवून पुढील आदेशापर्यंत सदरचा साठा जतन करण्याच्या सुचना दिल्या.

उपरोक्त बाबत घटनास्थळी पंचनामा करण्यात आला तसेच मे. अदानी विलमर लि. चे कॅरींग ॲन्ड फॉरवर्डींग चे काम पाहाणारे हेमंत भरत कोटक यांचा लेखी जबाब नोंदविण्यात येवून सुपूर्दनामा करण्यात आलेला असुन त्यांनी घटनास्थळी उपस्थित अधिकाऱ्यांना खालील नमुद कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या.
१) मे. अदानी विलमर लि. यांच्यावतीने दिनांक १०/१०/२००९ व दिनांक १२/०१/२०१० रोजी अनुक्रमे शिधावाटप अधिकारी, ठाणे व उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना अग्रेषित केलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती. २) दिनांक १९/१/२००९ रोजीचे रु १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरीकृत/नोंदणीकृत नसलेले दिनांक १५/४/२००९ ते दिनांक १४/४/२०१२ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता असलेले नमूद जागेचे भाडे करारपत्र. ३) माहे सप्टेंबर २००९ मधील खादयतेलाच्या साठयाचे विक्री दर्शविणारे विवरणपत्र. ४) मे. गोल्डन व्हॅली ॲग्रोटेक प्रा.लि. यांचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे अनुज्ञाप्ती क्रमांक निरंक असलेले खादयतेलाचे विक्री बिल. ५) मे. अदानी विल्मर लि. यांचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे अनुज्ञाप्ती क्रमांक निरंक असलेले खादयतेलाचे ३ विक्री बिले. ६)मे. अदानी

HEAD OFFI MUMBAI

विल्मर लि. यांनी नमूद पत्यावर साठवणूक केलेला खाद्यतेलाच्या साठ्याचा पुरवठा त्यांना कोठून झाला व सदरचे साठ्याबाबतचे जकात संबंधीचे दस्ताऐवज सादर करु शकले नाही. 003

उपरोक्त नमुद अनुक्रमांक-१ अन्वये दिनांक १०/१०/२००९ रोजी सादर केलेल्या अर्जाचे अवलोकन करता मे. अदानी विलमर लि. यांनी नविन घाऊक परवान्यासाठी अर्ज सादर केल्याचे आढळून आले. तसेच दिनांक १३/०१/२०१० रोजी मे. अदानी विलमर लि. यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ ठाणे यांना अग्रेषित करुन सादर केलेले स्वनिवेदनाचे अवलोकन केले असता, त्यांनी या विभागाच्या अधिकाऱ्यांनी तपासणीसाठी दिलेल्या स्थळभेटीच्या वेळी मुळ कागदपत्रे सादर केले नसुन ते ७ कार्यालयीन दिवसाच्या आत मुळ कागदपत्रे सादर न केल्यास त्यांनी केलेले अर्ज रद्द करण्यात येईल असे नमुद केले आहे. यावरुन त्यांनी नविन परवान्याकरीता सादर केलेल्या अर्जाची व त्याअनुषंगाने सादर करावयाच्या मुळ कागदपत्रांची मुदत संपल्याचे दिसुन येत आहे.

अनुक्रमांक २ मधील दिनांक १९/०१/२००९ रोजीचे भाडेकरारपत्राचे अवलोकन करता सदरचे करारपत्र नोटरीकृत/नोंदणीकृत नसल्याचे दिसुन येते.

अनुक्रमांक ३ मधील माहे सप्टेंबर २००९ च्या खादयतेलाच्या साठा व विक्री विवरणपत्राचे अवलोकन करता त्यांनी सदरच्या महिन्यात मे. अदानी विलमर लि. यांनी नविन परवान्यासाठी अर्ज सादर करण्यापूर्वी मोठया प्रमाणावर खादयतेलाची साठवणूक व विक्री केल्याचे निदर्शनास येते.

अनुक्रमांक ४ मधील मे. गोल्डन व्हॅली ॲग्रोटेक प्रा. लि. यांचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे एक विक्री बिल तसेच अनुक्रमांक ५ मधील मे. अदानी विलमर लि. यांचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे ३ विक्री बिले असे एकुण ४ विक्रीबिलांचे अवलोकन करता सदरच्या दोन्ही आस्थापनांचे विक्री बिलांवरील पत्ता हा एकच असुन त्यावरील स्वाक्षरीमध्ये साम्यता आहे. तसेच विक्री बिलांवरील अनुज्ञाप्ती क्रमांक निरंक असल्याचे निदर्शनास येते. यावरुन सदरचे दोन्ही आस्थापना एकाच पत्यावर विनापरवाना खादयतेलाची मोठया प्रमाणावर साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे सिध्द होते.

अनुक्रमांक ६ मधील मे. अदानी विल्मर लि. यांनी नमूद पत्यावर साठवणूक केलेल्या खाद्यतेलाचा पुरवठा त्यांना कोठून व कोणत्या मार्गाने प्राप्त झाला याबाबतचे तपशिल तसेच जकात संबंधीचे दस्ताऐवज ते भेटीच्या वेळेस सादर करु शकले नाहीत.

अशाप्रकारे मे. अदानी विलमर लि., गोडाऊन क्र. अे १४, गाळा क्र १५ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स, वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे यांनी नमुद पत्यावर मोठया प्रमाणात साठवणूक केलेल्या खादयतेल या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा

१९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेल/वनस्पती चा ५९२७.८१ क्विंटल व पामतेलाचा २०७.४९ क्विंटल असा मिळून एकुण ६१३५.३० क्विंटल साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आलेला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५-चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५-चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. १४/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि.१४/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. अदानी विलमर लि. कंपनीच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाही. तथापी, वाचावे क्र. ३ अन्वये टपालामार्फत त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले. परंतू निवेदनासोबत त्यांनी पुरावादर्शक कागदपत्रे जोडले नसल्याने संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २२/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. अदानी विलमर लि. या कंपनीच्या वतीने ॲड. श्री. मधुर बया हे उपस्थित राहिले व वकालतनामा तसेच कंपनीचे लेखी निवेदन व इतर दस्तऐवज सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. सदर सुनावणीस श्री हेमंत कोटक, कॅरिंग ॲन्ड फारवर्डींग एजंट व श्री आशिष नायर, डेप्युटी मॅनेजर (लिगल) हे उपस्थित होते. सबब, पुढील सुनावणी दिनांक ०१/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस कंपनीचे वतीने ॲड. श्री मधूर बया हे वकालतनामासह उपस्थित राहुन त्यांनी कंपनीच्या वतीने दिनांक २५/११/२०११ रोजीचे वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगुन वाचावे क्र. ५ अन्वये फेरनिवेदन सादर केले. सदर सुनावणीस श्री हेमंत कोटक, कॅरिंग ॲन्ड फारवर्डींग एजंट व श्री आशिष नायर, डेप्युटी मॅनेजर (लिगल) हे उपस्थित होते. तथापी सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादामध्ये कंपनीच्या वतीने इतर राज्य सरकारांशी केलेल्या पत्रव्यवहारांच्या छायांकित प्रति दिनांक ०२/१२/२०११ रोजी सादर करणार असल्याचे सांगितले. सदर पत्र त्यांनी टपालामार्फत वाचावे क्र. ६ अन्वये दिनांक ०५/१२/२०११ रोजी सादर केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक १६/११/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये ते सोयाबिन, सनफ्लॉवर, मस्टर्ड या खाद्यतेलाचे तसेच वनस्पतीचे शुध्दिकरण करुन त्यांचे मुंद्रा, मंत्रालयम, सुजलपुर इ. ठिकाणी उत्पादन करुन विविध ठिकाणी असलेल्या ८० गोदामांवर वितरण केले जात आहे. किरकोळ वितरकांस त्यांचे कंपनीचे असलेल्या विविध प्रकारचे खाद्यतेलाचे साठवणूक करणे शक्य नसल्याने तसेच त्यांना कमीतकमी वेळेत पुरवठा करणे शक्य व्हावे म्हणून ते गोदामांवर साठवणूक करीत आहे. सदर गोदामांवरुन घाऊक वितरकांना खाद्यतेलाची विक्री केली जाते. भिवंडी येथील गोदामामध्ये खाद्यतेलाची साठवणूक करुन तेथुन ३ जिल्हयांना वितरण केले जाते. त्यांच्या कंपनीच्या उत्पादनाच्या ठिकाणा व्यतिरिक्त भिवंडी येथील नमुद गोदामात खाद्यतेल/वनस्पतीचे साठवणूक केली जाते तसेच ते घाऊक अथवा किरकोळ व्यापारी नसुन उत्पादक असल्याने त्यांना फुडस्टफ ऑर्डर लागु होत नसल्याचे नमुद करुन सदर आदेशान्वये जीवनावश्यक वस्तुंची अंतरजिल्हा वाहतुक करणा-या व आयातदारास सुट देण्यात आली आहे. नमुद गोदामावर त्यांनी साठवणूक केलेला खाद्यतेलाचा ६१३५.३० क्विंटल साठा हा नफेखोरी, काळाबाजारी अथवा साठेबाजीच्या उद्देशाने केलेला नसल्याने दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंन्सिग ऑर्डर १९९८ हे आदेश उत्पादक म्हणून त्यांना लागु नाही.

दिनांक २५/११/२०११ रोजीच्या लेखी निवेदनामध्ये त्यांनी सेन्ट्रल एक्साईज ॲक्ट १९४४, लिगल मेट्रोलॉजी ॲक्ट २००९ तसेच फुडसेफ्टि स्टॅन्डर्ड ॲक्ट २००६ व त्यामधील समाविष्ट असलेल्या विविध आदेशान्वये त्यांनी उत्पादन केलेल्या प्रत्येक खाद्यतेलाच्या पॅकिंगवर एमआरपी, उत्पादनाचा दिनांक इ. तपशिल छापलेले आहेत. ते आयात करीत असलेल्या इंपोर्टेड बेस ऑईल या रॉ मटेरियलची किंमत स्थिर नसल्याने त्यांनी उत्पादीत केलेल्या पॅकिंगवर एमआरपी किंमतीत फरक आहे. तसेच परकिय चलन स्थिर नसल्याने त्यांचा आयात होणा-या साठयाची किंमत गेल्या काही महिण्यांपासुन वाढत आहे. त्यांच्या कंपनीचे दरदिवशी ३००० मे.टन खाद्यतेलाचे उत्पादन असुन त्यांच्या नामांकित असलेला फॉर्चुन हे खाद्यतेल मोठया प्रमाणावर विक्री होत असल्याने त्यांना गोदामाची आवश्यकता आहे. नमुद गोदामावरील साठयापैकी सुमारे ९५ % खाद्यतेलाचा साठा हा जप्तीचे दिनांकापूर्वी ३० दिवर अगोदर साठवणूक केलेला असून सदरचा साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने केलेला नाही. सन १९९८ चे आदेश हे खाद्यतेलाचे उत्पादकांना फॅक्टरीमध्ये तसेच त्यांचे विस्तारीत फॅक्टरीमधील साठयांना लागु होत नाही. बिहार राज्यामध्ये त्यांनी दिनांक ८/४/२०११ रोजी निर्गमित केलेल्या पत्रांन्वये साठवणूक मर्यादा उत्पादकांना लागु होत नसल्याचे नमुद केले आहे. केंद्रशासनाने निर्गमित केलेले फुडस्टफ ऑर्डर २००२ हे दिनांक १५/०२/२००२ च्या अधिसुचनेमधील अनुक्रमांक ३ व ४ मध्ये खाद्यतेलावरील निर्बंध काढुन टाकण्यात आले आहे. केंद्रशासनाने

डाळी/कडधान्य व खाद्यतेल (स्टोरेज कंट्रोल) ऑर्डर, १९७७ मध्ये दिनांक १०/११/१९९७ रोजी लागु केलेल्या सुधारणेनुसार खाद्यतेल वगळण्यात आले असल्याने खाद्यतेलाच्या साठवणूक इ. संबंधी परवान्याची गरज नसल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचे आदेश उत्पादकांना तसेच उत्पादकांनी साठवणूक केलेल्या खाद्यतेलाकरीता परवान्याची गरज नसल्याचे नमुद केले आहे. केंद्रशासनाच्या स्टोअरेज कंट्रोल ऑर्डर १९७७ मध्ये सुधारणा करण्यापूर्वी विविध राज्यांमध्ये खाद्यतेलाचे उत्पादकांना साठवणूकीची कमाल मर्यादा त्यांच्या वार्षिक उत्पादनाच्या १/१२ होती. सदर कमाल मर्यादा महाराष्ट्र राज्याच्या आदेशामध्ये अंतर्भुत केलेली नसली तरीही दिनांक ९/११/२०११ रोजी आढळून आलेला नमुद गोदामावरील साठा हा १/१२ पेक्षा कमी आहे.

दिनांक १/१२/२०११ रोजी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांनी नमुद गोदामावर साठवणूक केलेला सोयाबिन ऑईल, सनफ्लॉवर ऑईल, पामोलिन व वनस्पतीचा साठा हा आयात केलेल्या इंपोर्टेड क्रुड इडिबल ग्रेड ऑईल यापासुन बनविण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या फुड स्टफ या आदेशामध्ये सन २०११ साली केलेल्या सुधारणेनुसार आयात केलेल्या खाद्यतेलाच्या साठयास सुट देण्यात आलेली असल्याने महाराष्ट्र शासनाचे आदेश आयात केलेल्या खाद्यतेलासाठी लागु होत नसल्याचे नमुद केले आहे. तसेच केंद्र शासनाकडून निर्बंध असलेल्या खाद्यतेलाची मुदत ३०/९/२०११ रोजी संपली असुन व सदर आदेशास मुदतवाढ न दिली गेल्याने महाराष्ट्राच्या साठवणूकीचे आदेश ही ३०/९/२०११ नंतर स्थगित झाले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

मे. अदानी विलमर लि. यांचे गोडाऊन क्र. अे १४, गाळा क्र १५ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स, वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे दि.०९/११/२०११ रोजी या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचांसमवेत येथील कंपनीच्या गोदामात दुपारी ३.३० वाजता तपासणी करण्यासाठी नमुद पत्यावर भेट दिली असता गोदामात विविध ब्रांड असलेल्या तेलाचे बॉक्सेस व टिन पत्राचे विविध क्षमतेचे खादयतेलाने भरलेले डबे आढळून आले. पथकाने पंचांसमवेत सदर गोदामात प्रवेश करुन उपस्थित व्यक्तीने त्याचे नांव हेमंत भरत कोटक असे सांगुन सदर गोदामामध्ये मे. अदानी विलमर लि. या कंपनीच्या वतीने कॅरींग ॲन्ड फॉर्वर्डीगचे काम गेले अडीच वर्षा पासुन करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर हेमंत भरत कोटक यांना अधिकाऱ्यांनी स्वत:ची ओळख करुन देवून गोदामात साठवणूक केलेल्या मोठया प्रमाणावर खाद्यतेल साठयाच्या संदर्भात अधिकृत परवाना व इतर



0008

कायदेशीर दस्ताऐवजाची पहाणी करीता मागणी केली असता, हेमंत भरत कोटक यांनी खाद्यतेलाच्या साठा व विक्री करीता परवाना मिळणेकरीता दि.१०/१०/२००९ व दि.१२/०१/२०१० रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे येथे लेखी अर्ज सादर केल्याबाबतच्या पत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या. तसेच गोदामाच्या जागेबाबत अधिकृत कागदपत्रांची विचारणा केली असता उपस्थित इसमाने जागेच्या करारपत्राच्या छायांकित प्रती सादर केल्या.

तदनंतर अधिकाऱ्यांनी हेमंत भरत कोटक यांना खादयतेलाच्या साठवणूक व विक्री करीता परवाना प्राप्त करुन न घेतल्याबाबत ते करीत असलेला व्यवसाय अनधिकृत असल्याबाबत त्यांना सांगुन गोदामात असलेल्या खादयतेलाच्या साठयाची हेमंत भरत कोटक व पंचांसमक्ष प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आली असता सदर गोदामामध्ये खादयतेल/वनस्पतीचा ५,९२,७८१ कि.ग्रॅ. (५९२७.८१ क्विंटल) व पामतेलाचा २०,७४९ कि.ग्रॅ. (२०७.४९ क्विंटल) साठा आढळून आला.

उपरोक्त नमुद विनापरवाना साठवणूक केलेल्या खादयतेलाचा साठा, दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम २(Z)(IV)(VI), ३, ४, १० चा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्यामुळे उपस्थित अधिकाऱ्यांनी दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५(सी) अन्वये सदरचा संपुर्ण खादयतेलाचा विनापरवाना असलेला साठा पंचांसमक्ष पंचनामा करुन जागीच सिलबंद करुन जप्त करण्यात आला. सदर जप्त केलेल्या खादयतेलाच्या साठयाचा सुपूर्दनामा करुन हेमंत भरत कोटक यांच्या ताब्यात देवून पुढील आदेशापर्यंत सदरचा साठा जतन करण्याच्या सुचना दिल्या व तसा त्यांचा जबाब नोंदविण्यात आला.

अशाप्रकारे मे. अदानी विलमर लि., गोडाऊन क्र. अे १४, गाळा क्र १५ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स, वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे यांनी नमुद पत्यांवर मोठया प्रमाणात साठवणूक केलेल्या खादयतेल या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेल/वनस्पती चा ५९२७.८१ क्विंटल व पामतेलाचा २०७.४९ क्विंटल असा मिळून एकुण ६१३५.३० क्विंटल साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आलेला आहे.

तपासणीच्या वेळेस कॅरिंग ॲण्ड फॉरवर्डींग एजंट हेमंत भरत कोटक यांनी दि.१०/१०/२००९ व १२/०१/२०१० रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांच्या कार्यालयात खाद्यतेलाच्या घाऊक परवान्यासाठी

केलेल्या अर्जाच्या छायांकित प्रती सादर केल्या. त्याअनुषंगाने, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ या कार्यालयाकडून प्राप्त कागदपत्रानुसार नविन परवाना अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता शिधावाटप निरिक्षक यांनी दि.१२/०१/२०१० रोजी नमूद ठिकाणी भेट देवून तेथें उपस्थित हेमंत भरत कोटक यांना परवान्यासाठी आवश्यक कागदपत्रे ७ कार्यालयीन दिवसांत सादर करण्याच्या सुचना दिल्या होत्या. आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता न केल्याने उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. फप/परवाना/२०१०/जा.क्र.३६४२ दि.१३/०४/२०१० अन्वये नविन परवाना अर्ज निकाली काढण्यात आला आहे. यावरुन त्यांनी नविन परवान्याकरीता सादर केलेल्या अर्जाची व त्याअनुषंगाने सादर करावयाच्या मुळ कागदपत्रांची मुदत संपल्याचे दिसुन येत आहे. तथापी, नमुद गोदामावरील जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

मे. अदानी विलमर लि. यांचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा उत्पादनाच्या ठिकाणी नसुन तो भिवंडी येथील नमुद गोदामात आढळून आला आहे. दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये खाद्यतेल/वनस्पतीच्या विक्री व साठवणूकीकरिता नमुद गोदामावर मे. अदानी विलमर लि. या कंपनीने खाद्यतेलाच्या घाऊक परवाना घेणे क्रमप्राप्त आहे. परंतु उपरोक्त बाबी विचारात घेता मे. अदानी विलमर लि. या कंपनीस घाऊक परवाना घेण्यास स्वारस्य नसल्याचे दिसुन येत आहे.

मे. अदानी विलमर लि. यांच्या वतीने घटनास्थळी सादर केलेल्या खादयतेलाच्या साठा व विक्री विवरणपत्राचे अवलोकन करता त्यांनी माहे सप्टेंबर २००९ या महिन्यात नविन परवान्यासाठी अर्ज सादर करण्यापूर्वी मोठया प्रमाणावर खादयतेलाची साठवणूक व विक्री विनापरवाना केल्याचे निदर्शनास येते.

तपासणीचे वेळेस मे. गोल्डन व्हॅली ॲग्रोटेक प्रा. लि. या नावाचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे एक विक्री बिल तसेच मे. अदानी विलमर लि. यांचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे ३ विक्री बिले असे एकुण ४ विक्रीबिलांचे अवलोकन करता सदरच्या दोन्ही आस्थापनांचे विक्री बिलांवरील पत्ता हा एकच असुन त्यावरील स्वाक्षरीमध्येही साम्यता आहे. तसेच विक्री बिलांवरील अनुज्ञाप्ती क्रमांक निरंक असल्याचे निदर्शनास येते. याबाबत त्यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात खुलासा केलेला नाही.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००९/५४०/प्र.क्र.२११/नापु-२३ दिनांक ८ जुन, २००९ अन्वये आयात केलेल्या खाद्यतेला संदंर्भात मार्गदर्शक सुचनेमध्ये "आयातदारांनी आयात केलेल्या खाद्यतलाची व्यापारी / कमिशन एजंट / मिलर्स इत्यादींना विक्री करतांना पावतीवर Imported Edible Oil असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात

केलेल्या खाद्यतेलाच्या पावतीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करावा. तसेच आयात केलेल्या खाद्यतेलाच्या पावतीची (Bill Of Entry), १ सत्यप्रत, व्यापारी / कमिशन एजंट / मिलर्स / प्रोसेसर्स / क्लिनर यांना द्यावी." असे स्पष्टपणे नमूद असतांना उपरोक्त मे. गोल्डन व्हॅली ॲग्रोटेक प्रा. लि. या नावाचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे एक विक्री बिल तसेच मे. अदानी विलमर लि. यांचे दिनांक ८/११/२०११ रोजीचे ३ विक्री बिले असे एकुण ४ विक्रीबिलांचे अवलोकन करता त्यावर आयात संबंधीच्या आवश्यक नोंदी घेतल्या नसल्याचे दिसून येत आहे. यावरुन सदरचे दोन्ही आस्थापना एकाच पत्यावर विनापरवाना खादयतेलाची मोठया प्रमाणावर विनापरवाना साठवणूक केल्याचे सिध्द होते.

केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. २२२७(अ) दिनांक २७/०९/२०११ अन्वये खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या व्यापारावर दिनांक ३०/९/२०१२ पर्यंत निर्बंध आणलेले आहेत. सबब, दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर, १९९८ अन्वये तांदूळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल/वनस्पती, खाद्यतेल बिया या अनुसुचित वस्तूंचा व्यवसाय करण्याऱ्या व्यापाऱ्यांना (dealers) परवाना घेणे क्रमप्राप्त आहे.

ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.१६/०६/२००३ रोजी पारीत केलेले आदेश क्र. जीएसआर/४९०(ई) अन्वये डिलरची व्याख्या " Dealer means any person engaged in the business of purchase, movement, sale, supply, distribution or storage for sale of any of the commodities specified in clause ३ whether as a wholesaler or retailer or producer or manufacturer or exporter or importer and whether or not in conjunction with any other business and includes his representative or agent but does not include a producer or manufacturer or importer or exporter of sugar." म्हणजेच साखरेचे उत्पादक, आयातदार व निर्यातदार वगळता इतर अनुसुचीत वस्तुंच्या आयातदार, निर्यातदार व इतर यांना डिलरच्या व्याख्येतुन सुट देण्यात आलेली नाही.

"Removal of (Licensing requiretments, stock limits and Movement Restrictions) on specified foodstuffs (Amendment) Order, २०१०" या अधिसुचनेमधील अनुक्रमांक ३ मध्ये "Nothing contained in this Order shall affect the transport, distribution

or disposal of edible oils, edible oilseeds, rice, pulses and paddy to places outside the state nor shall it be applicable to import of these commodities" असे नमुद आहे.

तथापी, मे. अदानी विलमर लि. या कंपनीचे वतीने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते सोयाबिन, सनफ्लावर, मस्टर्ड या खाद्यतेलांचे तसेच वनस्पतीचे शुध्दिकरण करुन त्यांचे मुंद्रा, मंत्रालयम, सुजलपुर इ. ठिकाणी उत्पादन करुन त्यांचे विविध ठिकाणी असलेल्या ८० गोदामांवर वितरण केले जात आहे. तसेच त्यांनी नमुद गोदामावर साठवणूक केलेला सोयाबिन ऑईल, सनफ्लॉवर ऑईल, पामोलिन व वनस्पतीचा साठा हा आयात केलेल्या इंपोर्टेड क्रुड इडिबल ग्रेड ऑईल यापासुन बनविण्यात आलेला आहे तसेच त्यांनी इंपोर्टेड बेस ऑईल या रॉ मटेरियलची आयात केल्याचे नमुद केले आहे. म्हणजेच मे. अदानी विलमर लि. हे आयात करीत असलेला साठा हा Non-Edible स्वरुपात आहे.

सबब, केंद्रशासनाने निर्गमित केलेल्या उपरोक्त नमुद अधिसुचनेद्वारे edible oils, edible oilseeds, rice, pulses and paddy च्या साठयाची या राज्यातुन इतर राज्यात होणाऱ्या वाहतुक व वितरणास तसेच edible oils च्या आयातदारास सुट देण्यात आलेली आहे. मे. अदानी विलमर लि.यांनी सुनावणीच्या वेळेस केलेल्या खुलाशात, त्यांचो भिवंडी येथील नमुद गोदामावरील जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा अंतीम उत्पादीत साठा हा त्यांनी आयात केलेल्या Bill of entries मधील नमुद साठयापासुनच उत्पादन केल्याचे ते सिध्द करु शकले नाहीत. तसेच Bill of entries च्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता त्यांनी आयात केलेला साठा Crude Degummed Soyabean Oil, Crude Palm Oil, Crude Sunflower Seed Oil हे Non-Edible या स्वरुपात असल्याने ते मानवास खाणे योग्य नसल्याने सदरच्या Non-Edible Oil साठयाचे मे. अदानी विलमर लि. यांच्या उत्पादनाच्या ठिकाणी Refining and Processing म्हणजेच सदर Non-Edible Oil साठयाची शुध्दीकरणाची प्रक्रिया करुन त्यास मानवी खाण्यास योग्य म्हणजेच Edible बनविले आहे. सबब, आयातदारास सुट देण्यात आलेल्या Edible Oil च्या व्याख्येत त्यांनी आयात केलेला Non-Edible Oil साठा येत नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

सबब, मे. अदानी विलमर लि. या कंपनीकडे भिवंडी येथील नमुद गोदामावर दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये साठवणूकीचा परवाना नसल्याने तसेच जप्त खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याने त्यांनी दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३, ४, ५, ६, ७, ८, ९ तसेच जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५

चे कलम ३, ७, ८ व १० चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, मे. अदानी विलमर लि. यांचेविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक II १०६/२०११ दिनांक १४/१२/२०११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सबब, मे. अदानी विलमर लि. यांनी त्यांचे गोडाऊन क्र. अे १४, गाळा क्र १५ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स, वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे साठवणूक केलेल्या खाद्यतेल/वनस्पती या जीवनावश्यक वस्तुंचा विनापरवाना साठवणूक केलेला खाद्यतेल व वनस्पतीचा एकुण ६१३५.३० क्विंटल साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक II १०६/२०११ दिनांक १४/१२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश :-</u>

१) प्रस्तुत प्रकरणी मे. अदानी विलमर लि. यांनी त्यांचे गोडाऊन क्र. अे १४, गाळा क्र १५ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स, वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे या पत्त्यावरील गोदामामधील जप्त करण्यात आलेला खाद्यतेल व वनस्पतीचा एकुण ६१३५.३० क्विंटल साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेल व वनस्पतीचा साठा पोलिसांनी तात्काळ उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
मे. अदानी विल्मर लि.,
गोडाऊन क्र. ए-१४,
गाळा क्र-१९ ते २० प्रेरणा कॉम्प्लेक्स,
वळ गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे.
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच जप्त करण्यात आलेले खाद्यतेल/वनस्पतींचा साठा हा नाशवंत असल्याने आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे कार्यवाही करण्याकरिता पोलिसांना आवश्यक ती मदत करावी.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.



001